दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.८ एप्रिल २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २२० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 8 April 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 220 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## कोणाचा डाऊनफॉल होईल ते वेळच सांगेल

**मुंबई**–कोणाचा डाऊनफॉल होईल ते वेळच सांगेल. त्यामुळे मला यावर प्रतिक्रिया द्यायची नाही, असे काँग्रेस नेते नाना पटोले यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते पार्थ पवार यांनी काँग्रेसवर टीका केली होती. यावर पटोले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच ते राजकारणात अजून लहान आहेत, त्यामुळे मला त्यांच्यावर काही बोलायचे नाही, असेही पटोले यांनी म्हटले.शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर टीका करताना नाना पटोले म्हणाले, संजय राऊत यांना त्यांच्याच पक्षात कोणी मान्यता देत नाही, त्यामुळे आम्ही त्यांना मान्यता द्यावी असे वाटत असेल तर त्यावर मी काही प्रतिक्रिया देणार नाही.पुढे बोलताना नाना पटोले यांनी भाजपवर टीका करताना म्हटले की, धर्मामध्ये आणि भाषेत भाजपने जे वाद निर्माण करून ठेवले आहेत. या मुंबईत देशाच्या आर्थिक राजधानीत गुजराती मराठी वाद निर्माण होणे यामागे भाजप आहे. राज्याला खऱ्या अर्थाने आपले राज्यातले मुख्यमंत्री नाही चालवत. गुजरातचे लोक चालवतात. काँग्रेसच्या काळात असा कुठलाही वाद कधीही झाले नाही.

# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## ग्रामीण जनतेला मिळणार दर्जेदार आरोग्य सुविधा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या



हस्ते यावेळी करण्यात आले.राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

# अखिल भारतीय काँग्रेसच्या संघटन सृजन अभियानास उत्सपूर्द प्रतिसाद

## समाजातील शेवटच्या घटकाला संघटन सृजन अभियान न्याय देईल-नीतू वर्मा सोईन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यभारत पक्षीय संगघटनात्मक बदल फेरबदल करण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खरगे व विरोधीपक्ष नेते खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली संघटन सृजन अभियान सुरु असून,शहरातील शासकीय विश्रामगृह येथे सदरील कार्यक्रम कार्यकर्त्यांच्या उत्सपूर्द प्रतिसादात अखिल भारतीय काँग्रेसच्या नेत्या सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात संपन्न झाला.

यावेळी संघटन सृजन अभियान या कार्यक्रमासाठी दिल्लीहुन मुख्यनिरीक्षक श्रीमती नीतू वर्मा सोईन सह माजी आमदार





### तरुण कार्यकर्त्यांची लक्षनीय उपस्थिती : दत्ता कांबळे विश्वासपात्र

**राष्ट्रीय काँग्रेस पक्ष्याच्या सदरील कार्यक्रमास जेष्ठासह तरुण कार्यकर्त्यांची लक्षनीय उपस्थिती यावेळी निदर्शनास आल्याने दत्ता कांबळे यांच्यावरील कार्यकर्त्यांचा विश्वास दृढ असल्याची कार्यकर्त्यांत चर्चा आहे.**

एम एम शेख,संघटन निरीक्षक सुरेंद्र खोडजकर, प्रदेश समन्वयक सौ विद्याताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मुख्यनिरीक्षक नीतू वर्मा सोईन यांनी उपस्थित कार्यकर्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, समाजातील शेवटच्या घटकाला पक्षाचे संघटन सृजन अभियान न्याय देत सर्व स्तरातील लोकांना पक्ष संघटनेत सामावून घेऊन पक्ष मजबूत करू, तसेच यावेळी प्रत्येक कार्यकर्त्यांचं वैयक्तिक म्हणणं ऐकून सामान्य कार्यकर्त्यांचं पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मत घेतले.सदरील कार्यक्रमास तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे,जिल्हाउपाध्यक्ष महावीर मस्के,वरिष्ठ जिल्हाउपाध्यक्ष प्रवीण शेफ, वरिष्ठ नेते बाळासाहेब ठोंबरे, शहराध्यक्ष अफरोज तांबोळी,शेख अहेमद, कल्याण भारस्कर, सिद्धार्थ घडसे, अशोक कांबळे, हरिभाऊ चाळक, सतीश चाळक, जाणू शहा, हनुमान थोरात, संकेत कासार,अक्षय थोरात, दिपक क्षीरसागर, कृष्णा शिंदे, करामा चाऊस, फारुख शेख,किशोर कांबळे, सुधाकर कांबळे,असद काझी,कमलेश कांबळे, बंडू अडागळे, श्रीमंत कांबळे, रसीद शेख सह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामरक्षा स्तोत्र पठण स्पर्धेत चि.समर्थ नखातेचे यश

## वेदमूर्ती कृष्णा देवा जोशींच्या हस्ते गौरव

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

पुणे येथील प्रसिद्ध *शिव एस्ट्रोलॉजी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'राज्यस्तरीय रामरक्षा स्तोत्र पठण' स्पर्धेत माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील चि. समर्थ रामेश्वर नखाते याने घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत समर्थने द्वितीय क्रमांक पटकावून जिल्ह्याच्या लौकिकात भर घातली आहे. त्याच्या या यशाबद्दल सुप्रसिद्ध वेदमूर्ती कृष्णा देवा जोशी पात्रुडकर यांच्या हस्ते त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पात्रुड गावातील व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुणे येथून ऑनलाइन पद्धतीने पार पडलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यभरातून अनेक स्पर्धक सहभागी झाले होते. शुद्ध उच्चार, स्पष्टता आणि पाठांतर या निकषांवर समर्थने आपली छाप पाडत द्वितीय स्थान मिळवले.

समर्थच्या या यशाचे कौतुक करण्यासाठी पात्रुड येथे एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात



आले होते. यावेळी बोलताना वेदमूर्ती कृष्णा देवा जोशी म्हणाले की, आजच्या धावपळीच्या युगात तरुण पिढीने आपल्या संस्कृत संस्कृतीचा आणि स्तोत्र पठणाचा वारसा जपणे ही कौतुकास्पद बाब आहे. समर्थसारख्या बालकांनी केलेले हे पाठांतर इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, भजनी मंडळ आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. समर्थच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. त्याच्या या यशाचे श्रेय त्याने आपले गुरु आणि पालकांच्या मार्गदर्शनाला दिले आहे.

# साळेगाव येथे डिझेल वाहतुकीचे टँकर दुभाजकाला धडकले

## विजेचे खांब आणि संरक्षक जाळ्या झाल्या भुईसपाट

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज- कळंब रोडवर साळेगाव येथील बस स्टँडवर ११-१५ रात्री वाजण्याच्या सुमारास एक डिझेल टँकर दुभाजकाला धडकून अपघात झाला आहे. यात दुभाजकावर असलेली विजेचे खांब आणि जाळ्या भुईसपाट होवून टँकरचे नुकसान झाले.दि.६ एप्रिल रोजी रात्री ११-१५वाजण्याच्या सुमारास सोलापूरहून निघालेले डिझेलचे टँकर क्र.एम एच २३/ ए यू ४८६३ हे तेलगाव कडे जात असताना साळेगाव येथील रस्त्यावर असलेले दुभाजक न दिसल्यामुळे अचानक भरधाव वेगात असलेल्या टँकरच्या चालकाला दिसले नसल्याने टँकर रस्ते दुभाजकावर असलेल्या विजेच्या खांबाला धडकून खांब मोडला. तसेच दुभाजका वरच्या संरक्षक जाळ्या भुईसपाट झाल्या.या अपघातात डिझेल टँकर चे आणि दुभाजकाचे मोठे नुकसान झाले आहे. टँकर चालक बळीराम





देशमुख रा.कान्नापूर ता. परळी मात्र अपघातात कोणीही जखमी झाले नाही.

**टँकर रिकामे होते म्हणून अनर्थ टळला**

अपघातग्रस्त टँकर रिकामे असल्याने सुदैवाने पुढील अनर्थ टळला अन्यथा टँकर पेट घेण्याची भीती होती. तसेच शेजारी घरे होती.

**अपघाताची माहिती मिळताच पोलिस तात्काळ हजर**

अपघाताची माहिती मिळताच रात्र गस्तीवर असलेले गस्तीवर सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलीस हेड कॉन्स्टेबल नागरगोजे आणि पोलीस सहाय्यक पोलीस उप निरीक्षक शंभू देव दराडे हे हजर होऊन त्यांनी रस्त्यावरील वाहन आणि अडथळे दूर केले.

**मेगा कंपनीचा गलथानपणा**

या महामार्गाचे काम करीत मेगा इंजिनिअर अँड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी मर्यादित यांनी या महा मार्गावर गावाजवळ रस्ते दुभाजकाच्या ठिकाणी दुभाजक असल्याची माहिती दर्शविणारेफलक किंवा रात्री वाहनचालक यांचे लक्ष वेधण्यासाठी पिवळ्या पट्ट्या आणि इंडिकेटर्स लावले नसल्याने अनेक अपघात होत आहेत.

**मेगावर सुद्धा गुन्हे दाखल करणे आवश्यक**

मेगा कंपनीच्या हलगर्जी पणामुळे रस्त्यावर अपघात झाल्यास कंपनी आणि त्यांच्या अधिकाऱ्या विरुद्ध पोलिसात गंभीर गुन्हे दाखल केल्या शिवाय ते दक्षता घेणार नाहीत असे प्रवाशांची मागणी आहे.

## ग्रामसभा टाळुन कोणाला वाचवले जातेय

# आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात शहापूरमध्ये नागरिकांचा आक्रोश

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

शहापूर ग्रामपंचायतीतील कोट्यवधी रुपयांच्या कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर ग्रामसभा न घेण्याचा प्रकार समोर आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मागील काही वर्षांतील विकासकामांवर मोठ्या प्रमाणात खर्च दाखवण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात कामे अपूर्ण अथवा निकृष्ट असल्याचे आरोप होत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे ३ कोटी ४० लाख रुपयांचा खर्च दाखवण्यात आला असून, प्रत्यक्ष विकासकामे अत्यल्प झाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. लेखापरीक्षण अहवाल, बँक व्यवहार आणि कॅशबुक यामध्ये तफावत आढळल्याचा मुद्दा 'जागरूक होऊ' समूहाने पुढे आणला आहे. दरम्यान, २६ जानेवारी रोजी घेणे अनिवार्य





असलेली ग्रामसभा घेण्यात आली नाही, तसेच १७ मार्च रोजी ग्रामसभा घेण्याबाबत सादर केलेल्या अर्जावरही अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. यामुळे ग्रामपंचायतीकडून माहिती जाणीवपूर्वक दडवली जात असल्याचा संशय नागरिक व्यक्त करीत आहेत.ग्रामसभा ही गावाच्या कारभाराचा हिशोब मांडण्याचे व नागरिकांना प्रश्न विचारण्याचे प्रमुख व्यासपीठ असताना, तीच सभा टाळली जात असल्याने पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लेखापरीक्षणातील आक्षेप, निधीचा वापर, अपूर्ण कामे आणि इतर प्रशासकीय बाबींवर चर्चा होऊ नये, यासाठीच ग्रामसभा टाळली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही स्पष्ट भूमिका मांडण्यात आलेली नाही. मात्र, नागरिकांनी लवकरात लवकर ग्रामसभा घेऊन सर्व आर्थिक व्यवहारांचा खुलासा करावा, अशी जोरदार मागणी केली आह

# संपादकीय

## पुन्हा चंद्रमाच्या दिशेने



५३ वर्षांनी मानवाने पुन्हा चंद्राच्या दिशेने पाऊल टाकले. यावेळी 'नासा'ची 'आर्टेमिस २' ही मोहीम आहे. या मोहिमेद्वारे अंतराळवीर चांद्रप्रदक्षिणा पूर्ण करून पृथ्वीवर परतणार आहेत. १९७२ मधील अपोलो १७ मोहिमेनंतर मानवी अंतराळ प्रवासाच्या इतिहासातील ही सर्वात लांबची आणि महत्त्वाची मोहीम मानली जात आहे.फ्लोरिडा येथील केनेडी अंतराळ केंद्रातून 'स्पेस लॉन्च सिस्टम' (एसएलएस) या महाकाय रॉकेटच्या साहाय्याने ओरियन अंतराळयान अंतराळात झेपावले. यात कमांडर रीड वाईजमन यांच्या नेतृत्वाखालील पथकात पायलट व्हिक्टर ग्लोव्हर, मिशन स्पेशालिस्ट क्रिस्टीना कोच आणि कॅनेडियन अंतराळ संस्थेचे जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. क्रिस्टीना कोच यांच्याकडे आधीच सर्वात लांब एकल अंतराळ प्रवासाच्या विक्रमाची पार्श्वभूमी आहे. या मोहिमेद्वारे त्या चंद्राच्या कक्षेत पोहोचणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. हे चारही तज्ज्ञ चंद्राच्या 'फार साईड'चे म्हणजेच पृथ्वीवरून कधीही न दिसणाऱ्या भागाचे प्रत्यक्ष निरीक्षण करणार आहेत. ही मोहीम केवळ चांद्रप्रदक्षिणा नाही, तर भविष्यातील मंगळ मोहिमा आणि चंद्रावर कायमस्वरूपी मानवी वस्ती स्थापन करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आधार ठरणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मानवी अंतराळ प्रवासाच्या मर्यादा तपासणे आणि नवीन तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष वातावरणात चाचणी करणे हा आहे. आर्टेमिस-२ ही एक 'क्रूड फ्लायबाय' मोहीम आहे.याचा अर्थ असा की, अंतराळवीर चंद्राच्या पृष्ठभागावरउतरणार नाहीत, तर चंद्राच्या मागच्या बाजूने एक विस्तीर्ण वळण घेऊन पृथ्वीवर परततील. या दहा दिवसांच्या प्रवासात ओरियन यान पृथ्वीपासून सुमारे ३,९३,००० किलोमीटर अंतरापर्यंत मजल मारेल. हे अंतर अपोलो १३ मोहिमेने प्रस्थापित केलेला विक्रम मोडीत काढणारे ठरेल. हे यान पृथ्वीपासून २.३ लाख मैल दूर जाणार आहे. पण याचा खरा उद्देश ओरियन स्पेसक्राफ्टच्या जीवन प्रणालीचा अभ्यास करणे हा आहे. ही मोहीम काढण्यामागे मुख्य कारण आहे ते २००८ मध्ये नासाने चांद्रयान मोहीम काढली होती त्यात चंद्रावर पाणी असल्याचे पुरावे दिले होते. त्याची पडताळणी करण्यासाठी ही मोहीम आखली आहे.अर्थात यावेळी त्यांच्या मोहिमेचा उद्देश चंद्रावर जाऊन झेंडा उभारण्याचा नाही. तेव्हा अमेरिका आणि रशिया यांच्यात वैज्ञानिक वर्चस्वाची लढाई होती आणि त्यात वर्चस्व कोण राखते यावर प्राणपणाला लावून ती लढाई खेळली जात असे. पण आता तो काळ मागे पडला. रशियाही आता कोसळला आणि अमेरिका जगातील सर्वात बलवान राष्ट्र राहिले नाही. आर्टिमिस हे विज्ञान आणि भू-राजकीय संघर्षात वेगळे युगाचे प्रतिनिधित्व करते. चीन आणि अमेरिकन अंतराळ स्पर्धेत चंद्र हे एकमात्र अग्रगण्य स्थान आहे. त्यासाठीच दोन्ही देशांचा संघर्ष आहे. आर्टेमिस हे जागतिक पवित्र्याबाबत व्यापक अंतराळ संशोधन आहे. या मोहिमेचा उद्देश अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. चंद्रावर हिम सापडले होते आणि शास्त्रज्ञांचा अंदाज असा आहे, की चंद्रावर खड्डे आहेत आणि या हिमाचा उपयोग स्पेस स्टेशन बांधण्यासाठी करता येऊ शकतो का? तसेच चंद्रावर जीवरक्षक प्रणालीसोबत प्राणवायू आणि हायड्रोजन या वायूंचा उपयोग करून रॉकेट लॉंचर्ससाठी त्यांचा उपयोग करता येईल का? पण या मोहिमेने अमेरिकेची या अंतराळ वर्चस्वातील दादागिरी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे हे तर कबूल करावेच लागेल.अमेरिकेची स्पर्धा आता रशियाशी नाही तर चीनशी आहे, हे या निमित्तान सिद्ध झाले. कारण चीन आणि अमेरिका यांच्यातील अंतराळ स्पर्धेला नवा आयाम या आर्टेमिस मोहिमेने दिला आहे. चंद्रीय अवकाशात या मोहिमेने नव्या स्पर्धेला तोंड फुटले आहे आणि अमेरिका आणि चीन यांच्यात तांत्रिक वर्चस्वासाठी जबरदस्त लढाई आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भू-राजकीय वर्चस्वासाठीही हे युद्ध आहे. या दृष्टीनेच नासाच्या या मोहिमेकडे पाहिले पाहिजे. चंद्राचा दक्षिण ध्रुव हा या स्पर्धेचे मैदान बनला आहे आणि दोन्ही राष्ट्रे संभाव्य पाण्याच्या स्पर्धेसाठी आणि स्त्रोतांसाठी त्यात उतरली आहे. अमेरिकेने या दिशेने सुरुवात केली आहे, तर चीन २०२८-२९ मध्ये चंद्रावर उतरून आपली मोहीम पार पाडणार आहे. आर्टेमिसचे महत्त्व हे आहे, की त्यातून जास्त सुपिरियर मानवी उड्डाण क्षमता कुणाची आहे हे सिद्ध करणार आहे. त्यामुळे अंतराळात आपले प्रथम स्थान निर्माण करून त्यावर राहणे हेच अमेरिकेचे उद्दिष्ट आहे.अमेरिकेची मोहीम ही युरोप, कॅनडा आणि जपान यांच्या अंतराळ संशोधकांची मिळून बनलेली व्यापक आणि सर्वसमावेशक आहे, तर चीनची स्वतंत्र आहे.अर्थात चीनचा भागीदार रशिया आहे. आर्टेमिस यशस्वी परत आल्याने अमेरिकेचे वर्चस्व सिद्ध झाल्याने चीन या स्पर्धेत काहीसा मागे पडणार आहे. ही अंतराळ स्पर्धा केवळ द्विपक्षीय नाही, तर भारतासारख्या देशांनीही आपली ताकद अंतराळ वर्चस्वात दाखवून दिली आहे.भारताने चंद्रीय प्रदेशात आपले वर्चस्व दाखवून केवळ हे दोन देशांतील युद्ध नाही, तर बहुदेशीय आहे, हे सिद्ध केले. आर्टेमिस हे अमेरिकेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण अंतराळ संशोधनात अमेरिका यातूनच आपले पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त करू शकते. चीनच्या प्रगत क्षमतांच्या संदर्भात अमेरिकेला आपली ताकद या मोहिमेद्वारे दाखवून देता येईल. आर्टेमिस ही दहा दिवसांची मोहीम असून त्यातून अमेरिका पुन्हा एकदा आपले चंद्रिय अवकाशात वर्चस्व सिद्ध करेल, तर चीनला त्याची मोहीम आणखी जोरकस करण्यासाठी प्रेरित करेल. अमेरिका आणि चीन यांच्यात आता नव्याने चंद्रासाठी स्पर्धा तयार झाली आहे आणि त्यात वर्चस्व कोण गाजवते यावर अंतराळ स्पर्धेचे भवितव्य ठरणार आहे. १९६१ मध्ये युरी गागारिन हा पहिला अंतराळ वीर ठरला होता. त्यानंतर अमेरिकेची चांद्रमोहीम झाली आणि त्यानंतर आता पुन्हा आर्टिमिस ही मोहीम पार पाडली.

# मुंबई ते लातूर प्रवास आता ५ तासांत ; केज जवळून जाणाऱ्या 'जनकल्याण' महामार्गाचे संरेखन पूर्ण

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या दळणवळण व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणाऱ्या कल्याण - लातूर 'जनकल्याण' महामार्ग प्रकल्पाला अखेर महत्त्वाचा टप्पा गाठता आला आहे.महाराष्ट्रराज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) कडून या ४५० किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे सरेखन (Alignment) पूर्ण करण्यात आले असून,आता हा प्रस्ताव राज्य सरकारच्या मान्यते साठी पुढे पाठवला जाणार आहे.या प्रकल्पा मुळे सध्या १० ते १२ तास लागणारा मुंबई- लातूर प्रवास अवघ्या ५ तासांत पूर्ण होणार असल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.



**प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

हा महामार्ग ठाणे,पुणे, अहिल्यानगर,बीड, धाराशीव आणि लातूर या सहा जिल्ह्यांमधून जाणार आहे.विशेष म्हणजे,केज परिसरातून हा महामार्ग जाणार असल्याने बीड जिल्ह्यातील वाहतूक आणि आर्थिक हालचालींना मोठी चालना मिळणार आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा यांच्यातील अंतर केवळ वेळेतच नव्हे तर विकासाच्या दृष्टीनेही कमी होणार आहे.

बीड-धाराशीव वादाचा 'सुवर्णमध्य'महामार्गाच्या मार्गावरून बीड आणि धाराशीव जिल्ह्यांमध्ये काही काळ वाद सुरू होता.मात्र, एमएसआरडीसी ने या वादावर तोडगा काढत 'सुवर्णमध्य' साधला आहे.दोन्ही जिल्ह्यांना मुख्य महामार्गाशी जोडण्यासाठी अंतरबदल (interchange) मार्ग देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्यामुळे दोन्ही जिल्ह्यांना समान फायदा मिळणार आहे.

**प्रवासात मोठी बचत**

सध्या मुंबई ते लातूर प्रवासासाठी साधारण १० ते १२ तास लागतात. नवीन महामार्गामुळे हा वेळ थेट ५ तासांपर्यंत कमी होणार आहे.यामुळे इंधन खर्च कमी होईल व वेळेची मोठी बचत होईल तसेच व्यावसायिक वाहतूक जलद होईल

**मराठवाड्याच्या विकासाला चालना**

या महामार्गामुळे मराठवाडा भागात औद्योगिक आणि आर्थिक विकासाला मोठी गती मिळण्याची अपेक्षा आहे.बीड, धाराशीव आणि लातूर या जिल्ह्यांमध्ये नवीन उद्योग,लॉजिस्टिक पार्क, वेअरहाऊस आणि व्यावसायिक केंद्रे उभी राहण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची जलद वाहतूक करता येणार असल्याने कृषी क्षेत्रालाही फायदा होणार आहे.पुढील टप्पा एमएसआरडीसी कडून संरेखन पूर्ण झाल्यानंतर आता अंतिम प्रस्ताव पुढील ८ ते १० दिवसांत राज्य सरकार कडे पाठवला जाणार आहे. सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर जमीन संपादन प्रक्रिया सुरू होईल.टेंडर प्रक्रिया राबवली जाईल प्रत्यक्ष कामाला गती मिळेल

**पायाभूत सुविधांमध्ये मोठी झेप**

हा महामार्ग केवळ एक रस्ता नसून महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी झेप मानली जात आहे.राज्यातील प्रमुख शहरांना जोडणारा हा मार्ग भविष्यात आर्थिक कॉरिडॉर म्हणून विकसित होऊ शकतो.

**केजसाठी विशेष महत्त्व**

केजपरिसरातून महामार्ग जाणार असल्यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती वाढेल.लघुउद्योगांना चालना मिळेल,जमीन मूल्यांमध्ये वाढ होईल कल्याण -लातूर 'जनकल्याण' महामार्ग हा महाराष्ट्रासाठी एक गेमचेंजर प्रकल्प ठरणार आहे.वेळ,पैसा आणि श्रम वाचवणारा हा मार्ग मराठवाड्याच्या विकासाचे नवे दार उघडणार आहे.आता राज्य सरकारच्या मंजुरी नंतर या प्रकल्पाची अंमलबजावणी कधी सुरू होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# स्वामी विवेकानंद विद्या मंदिर शाळेतील सात विद्यार्थ्यांची राजर्षी शाहू महाविद्यालय व संत तुकाराम महाविद्यालय स्क्रीनिंग टेस्ट द्वारे निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**









जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेतील ७ विद्यार्थ्यांची राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर तसेच संत तुकाराम महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्ट द्वारे निवड झाली आहे.यामध्ये राजर्षी शाहूमहाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये- श्रावण रामदास चाटे, आकांक्षा दीपक सांजुरे, प्रज्ञा दिनकर घुले,श्रेयश रघुनाथ बनसोडे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.तर संत तुकाराम महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये-सई बालाजी साखरे,ज्ञानदा सुनील गायकवाड,आयुष जयप्रकाश सातपुते या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.वरील विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे,उपाध्यक्ष नईमोद्दीन इनामदार, सचिव जी.बी.गदळे, सहसचिव तथा मुख्याध्यापक उपेंद्र कोकीळ,कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काझी, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शैलाताई इंगळे, स्वयंअर्थ शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायणराव अंधारे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,प्राचार्य शंकर भैरट सर, प्राथमिक विभागाचे मु. अ.वसंत शितोळे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी राज्यसभा खासदार पदाची केली हॅट्रिक

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची तिस-यांदा राज्यसभेवर बिनविरोध निवड झालेली आहे. सोमवार दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी संसदेत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपल्या तिसऱ्या टर्मच्या राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतल्याने त्यांनी राज्यसभा खासदार पदाची हॅट्रिक केली आहे. राज्यसभेतील हॅट्रिकबद्दल रामदास आठवले यांचे देशभरातील दलित बहुजन आंबेडकरी जनतेसह सर्व वर्गातील जनतेने अभिनंदन केले आहे.महाराष्ट्रातून राज्यसभेवर ७ खासदार बिनविरोध निवडून गेलेले आहेत. त्यात रामदास आठवले यांचा समावेश आहे. राज्यसभेवर सलग तिसऱ्यांदा बिनविरोध निवड होऊन रामदास आठवले यांनी राज्यसभा खासदार म्हणून हॅट्रीक केलेली आहे. आपल्या राज्यसभेच्या तिसऱ्या टर्मची सुरुवात रामदास आठवले यांनी आज सोमवार दिनांक ६ एप्रिल २०२६ पासून केली आहे.रामदास आठवले यांची एप्रिल २०१४ ला सर्वप्रथम राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. त्यानंतर एप्रिल २०२० मध्ये दुसऱ्यांदा राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. एप्रिल २०२० ते २ एप्रिल २०२६ पर्यंत त्यांच्या दुसऱ्या टर्मची मुदत होती. आज सोमवार दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी संसदेत रामदास आठवले आपल्या राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या तिसऱ्या टर्मला सुरुवात झाली आहे. दिनांक ६ एप्रिल २०२६ ते एप्रिल २०३२ पर्यंत रामदास आठवले यांची राज्यसभेत तिसरी टर्म राहणार आहे. तिसऱ्यांदा राज्यसभेत निवड झाल्याबद्दल केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे देशभरातील दलित, बहुजनांनी हार्दिक स्वागत आणि अभिनंदन केले आहे. देशभर ना. रामदास आठवले यांचे सत्कार आणि स्वागत होत आहे. ना.रामदास आठवले यांना तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवडून दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राज्यभरातील आंबेडकरी रिपब्लकन जनतेतर्फे हार्दिक आभार मानले जात आहे.आपल्या तिसऱ्या राज्यसभा सदस्यत्वाची रामदास आठवले यांनी आज सोमवार दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी संसदेत शपथ घेतल्यानंतर त्यांच्यावर आंबेडकरी जनतेने शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.



# पत्रकारांच्या सुख-दुःखात साथ देणे हीच समूहाची ओळख-डॉ.विश्वासराव आरोटे

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**




दैनिक समर्थ गावकरी समूहाच्या वतीने आयोजित संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर मेळावा कोकमठाण , कोपरगाव येथे पार पडला. संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारांच्या एकजुटीचे महत्त्व अधोरेखित करताना संघटित राहण्याचे आवाहन केले. गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा या मंत्रोच्चाराने त्यांनी भाषणाची सुरुवात करत पत्रकार हे समाजाचे मार्गदर्शक असून त्यांच्या कार्याचा सन्मान करणे हीच खरी गुरुदक्षिणा असल्याचे सांगितले. डॉ. आरोटे म्हणाले की, दैनिक समर्थ गांवकरी समूह दरवर्षी ग्रामीण भागातील पत्रकारांचा मेळावा आयोजित करतो. वर्षभर विविध भागात काम करणाऱ्या पत्रकारांना एकत्र आणणे, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि संवादाची साखळी मजबूत करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या व्यासपीठावर राजकीय नेते किंवा पदाधिकारी यांना प्राधान्य न देता संघर्षातून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या व्यक्तींना आमंत्रित करण्याची परंपरा समूहाने जपली असल्याचे त्यांनी सांगितले.

याच अनुषंगाने शिवनेरी-जुन्नर भागातील शेतकरी कुटुंबातून संघर्ष करत पुढे आलेल्या बिग बॉस फेम तथा सरकार सेना संघटनेच्या अध्यक्षा दिव्या शिंदे यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. खासदार, आमदार किंवा मंत्री यांचा कार्यकाळ मर्यादित असतो; मात्र संघर्षातून उभ्या राहिलेल्या व्यक्ती समाजाला प्रेरणा देतात, त्यामुळे अशा व्यक्तींना व्यासपीठ देणे ही समूहाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रसंगी समूहाचे मालक नानजीभाई ठक्कर, कार्यकारी संपादक नवनाथ जाधव, नवी मुंबईचे संपादक दशरथ चव्हाण, व्यवस्थापक संजय फुलसुंदर यांच्यासह राज्यभरातील प्रतिनिधी व वार्ताहर उपस्थित होते. डॉ. विश्वासराव आरोटे पुढे म्हणाले की, समूहातील बहुतांश पत्रकार हे तळागाळातील सर्वसामान्य कुटुंबातून आलेले आहेत. संघर्षमय परिस्थितीत काम करत असताना त्यांना मानसिक आधार मिळावा आणि त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले जावे यासाठी हा मेळावा महत्त्वाचा आहे. पत्रकार वर्षभर जनतेचे प्रश्न मांडतात; मात्र पत्रकारांवर संकट आले तर त्यांच्या समस्या ऐकून घेणे आणि मदतीचा हात पुढे करणे ही संघटनेची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

## सारोळा प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराला १,४२,८८७ रुपयांचे बक्षीस

# वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ उत्साहात संपन्न सांस्कृतिक कार्यक्रमांनी जिंकली प्रेक्षकांची मने

**दैनिक वादळ वार्ता**
**जामखेड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे प्रभावी माध्यम म्हणजे शालेय स्नेहसंमेलन.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा,केंद्र- राजुरी,ता.जामखेड, जि.अहिल्यानगर या प्रशालेचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवार,दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी सारोळा प्रशालेच्या प्रांगणात अत्यंत उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न झाले.श्री.हनुमान जन्मोत्सव व सारोळा ग्राम यात्रा याचे औचित्य साधत प्रशालेच्या वतीने भव्य दिव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
अवकाळी संभाव्य पाऊसाचा अंदाज असल्यामुळे उद्घाटन कार्यक्रम संक्षिप्त स्वरूपात करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सारोळा गावचे सरपंच रितुताई अजयदादा काशिद , मान्यवर अतिथी म्हणून उपमहाराष्ट्र केसरी बबनकाका काशिद,अजयदादा काशिद तसेच प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख माजीद शेख,विक्रम बडे व पांडुरंग मोहळकर साहेब, ग्रामपंचायत सदस्य किरण मुळे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतीश मुळे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जगदाळे यांची उपस्थिती लाभली.सर्व मान्यवर अतिथी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमापूजन करत व बालकलाकारांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती करून सदर स्नेहसंमेनालाचा शुभारंभ करण्यात आला.
यावेळी सारोळा प्रशालेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा,ङट--ऋमुल्यांकन,विविध गुणदर्शन व क्रीडा स्पर्धा तसेच छचचड,शिष्यवृत्ती,नवोदय, यासारख्या शालेय स्पर्धा परीक्षा, विज्ञान प्रदर्शन, जिल्हास्तर विज्ञान परीक्षा व आविष्कार सहल यामध्ये संपादन केलेल्या उत्तुंग यशाबद्दल सर्व विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक वृंद यांचा नितांत अभिमान व गर्व असल्याचे मत सरपंच अजयतदादा काशिद यांनी आपल्या मनोगत प्रसंगी व्यक्त केले.
सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्ताने पहिली ते आठवी पर्यंतच्या विविध विद्यार्थ्यांनी बालगीत,राष्ट्रभक्तीपर गीत,शिवगीत,शेतकरी गीत, महाराष्ट्राची लोकपरंपरा व विविध मराठी सण, ऑपरेशन सिंदूर,मराठी व हिंदी चित्रपटातील सुप्रसिद्ध गीते, येडाई माझा जीव ,नमो आदेश यासारखी विविध देवदेवतांची गीत यावर आधारित अफलातून व अप्रतिम नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.उपस्थित माता,पालक शिक्षक वृंद,मान्यवर व्यक्ती व ग्रामस्थ यांनी, विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या एकूण ३० कलाविष्काराला सकारात्मक प्रतिसाद देत तब्बल एक लाख बेचाळीस हजार आठशे सत्याऐंशी (१,४२,८८७/-) रुपयांचा बक्षीस स्वरूपात लोकसहभाग प्राप्त करून दिला.
सदर कार्यक्रमाच्या उत्तरार्धात,नूतन केंद्रप्रमुख माजीद शेख साहेब व शबाना शेख मॅडम तसेच नूतन ग्रेड मुख्याध्यापक संदीप भालसिंग सर तसेच नव्याने रुजू झालेले सुरेश बर्वे सर व वृषाली खांदवे मॅडम यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.
सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रेड मुख्याध्यापक संदिप भालसिंग,सूत्रसंचालन प्रशांत होळकर व श्री.सुरेश बर्वे,आभार राहुल लिमकर यांनी व्यक्त केले.तर विद्यार्थी वेशभूषा व ड्रेपरी यांचे सनियंत्रण अमृता रसाळ,वृषाली खांदवे मॅडम व शबाना शेख मॅडम यांनी केले.तर साऊंड सिस्टीम व्यवस्था यासीनभाई हळगाव तर संपूर्ण कार्यक्रमाची फोटोग्राफी व व्हिडिओ शूटिंग याचे काम मनोज फोटोग्राफर जामखेड यांनी केले सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरपंच,उपसरपंच, व सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच अध्यक्ष, उपाध्यक्ष व शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य ,चेअरमन, व्हा.चेअरमन व सर्व सदस्य,वि.का. सो.सोसायटी,पोलिस पाटील,सर्व माता,पालक व ग्रामस्थ,मुख्याध्यापक,सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी यांचे मोलाचे विशेष सहकार्य लाभले.



# बीड जिल्हा बंजारा ब्रिगेड ची आढावा बैठक संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**



दिनांक ४ एप्रिल रोजी बंजारा ब्रिगेड राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत भाऊ राठोड यांच्या उपस्थितीत गेवराई येथील शासकीय विश्रामगृहात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्या बैठकीत बंजारा ब्रिगेड च्या पुढील वाटचालीसाठी संदर्भात चर्चा करून तांडा तेथे शाखा अनावरण करून तांड्यातील विविध समस्या अणि त्या समस्या सोडविण्यासाठी बंजारा ब्रिगेड सज्ज राहणे गरजेचे आहे व अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली या कार्यक्रमासाठी बंजारा ब्रिगेड चे प्रदेश प्रवक्ते अनिल भाऊ खोला प्रदेश उपाध्यक्ष सतीश भाऊ आमगोत जिल्हा अध्यक्ष योगेश भाऊ पवार यांची पण मार्गदर्शन पर भाषणे झाली या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीड जिल्हा सचिव प्रमोद भाऊ राठोड यांनी केले व अनुमोदन तालुका अध्यक्ष अमोल भाऊ राठोड यांनी केले यामध्ये काही नवीन पदाधिकारी यांची निवड व जुन्या पदाधिकारी यांची फेरनिवड करण्यात आली तसेच प्रदेश प्रवक्ते अनिल राठोड खोला प्रदेश उपाध्यक्ष सतीश आमगोत व जिल्हा अध्यक्ष योगेश भाऊ पवार यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे स्वागत करण्यात आले तालुका फेरनिवड म्हणून तालुका अध्यक्ष पदी अमोल भाऊ राठोड उपाध्यक्ष अंकुश राठोड व पोपट चव्हाण सचिव योगेश राठोड सह संघटक बाळू जाधव माजलगाव तालुका अध्यक्ष पदी भानुदास भाऊ जाधव यांची निवड करण्यात आली तसेच नवीन पदाधिकारी यांच्या निवडी मध्ये तुळशीराम भाऊ जाधव सोशल मीडिया जि प्रमुख विष्णु राठोड जि प्रसिद्धी प्रमुख गेवराई तालुका युवक अध्यक्ष पदी रविंद्र पवार तालुका संघटक विठ्ठल राठोड तालुका सोशल मीडिया प्रमुख बाळू पवार तालुका सह सचिव सुरेश चव्हाण तालुका विद्यार्थी आघाडी रमेश राठोड यांच्या नव्याने निवडी करण्यात आल्या
तसेच काही सर्कल च्या पदाधिकारी यांची पण निवड करण्यात आली त्यात जातेगाव सर्कल प्रमुख पदी दत्ता राठोड उप सर्कल प्रमुख अविनाश पवार सचिव पदी राहुल पवार व गढी सर्कल प्रमुख पदी भास्कर राठोड यांची निवड करण्यात आली अशा प्रकारे बंजारा ब्रिगेड च्या आढावा बैठकीत नियोजन करण्यात आले या बैठकी साठी जिल्ह्यातून जास्तीत जास्त युवकांनी हजेरी लावली व प्रतिसाद दिला या कार्यक्रमाचे समारोप पर भाषण राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत भाऊ राठोड यांनी केले

## गोशामहल भाग्यनगरचे हिंदूवादी आ.राजासिंग ठाकूर यांची देगलूर येथील युवकांनी घेतली भेट



**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

दिनांक ४ एप्रिल २०२६ रोजी बिलोली येथे विश्व हिंदू परिषद बजरंग दल तर्फे भव्य धर्मसभा आयोजित करण्यात आली होती,
या सभेला तेलंगणा राज्याचे गोशामहल विधानसभेचे भाग्यनगर (हैदराबाद) येथील हिंदुवादी आमदार टायगर राजसिंग भैया ठाकूर यांनी मार्गदर्शन केले, यावेळी त्यांना भेटून त्यांचे युवकांनी स्वागत केले, सभा संपल्यानंतर सर्वजण त्यांना सोडण्यासाठी महाराष्ट्र - तेलंगणा बॉर्डर पर्यंत गेले.
आणि परत निघाले असता
ते थोडा वेळ जेवणासाठी थांबले आहेत लवकर आला तर भेट होईल म्हणून व्यंकटेश टेकाळे अण्णा यांचा कॉल आला.
लगेच सर्वजण तिथे पोचले त्यांच्यासोबत १० - १५ मिनिटे दिलखुलास गप्पा झाल्या,
आदरणीय ह.भ.प. चंद्रशेखर जी महाराज देगलूरकर यांनी आयोजित पारायण सोहळ्यासाठी राजा भैया देगलूर येथे आले असता ते प्रशांतभाऊ दासरवार यांच्या घरी आल्याची त्यांना आठवण करून दिले असता,
आपके घर हम खाना खाये थे, मुझे आज भी वो अच्छा याद है, असे आवर्जून आमदार राजा सिंग म्हणाले, आणि आस्तेवाईकपने घरी सर्वजण कसे आहेत सर्वांचे तब्येत ठीक आहे का म्हणून विचारपूस केले.
यावेळी उपस्थित प्रशांतभाऊ दासरवार, व्यंकटेश अण्णा टेकाळे, सुरेश भाऊ मिसाळे, अनिलजी कोंडेकर, संतोष जी राजेशलूवार, धनाजी भाऊ जोशी, राहुलभाऊ श्रीरामवार, श्री.जिल्हेवार सावकार, पाटील, आदींची उपस्थिती होती..

## श्रमजीवीच्या आक्रमक पविञ्यानंतर वाड्यातील वरले कातकरी वाडीला मिळाला स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अधिकार; श्रमजीवी संघटनेला यश

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर । प्रतिनिधी**

नळ योजनेतून डावललेल्या वरले कातकरी वाडीला मिळाला पिण्याच्या पाण्याचा अधिकार
वाडा, दि. - वाडा तालुक्यातील वरले ग्रामपंचायत हद्दीतील कातकरी वाडीतील नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठीची अनेक वर्षांची वनवण अखेर संपली आहे. कातकरी वाडीतील नागरिकांना विहिरीतील दूषित, जंतू पडलेले पाणी पिण्यास भाग पडत होते, तर दुसऱ्या बाजूला बोअरवेलमधील स्वच्छ पाणी नळ योजनेद्वारे गावातील काही मोजक्या लोकांनाच मिळत होते.
या अन्यायकारक परिस्थितीची माहिती श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी याविरोधात आक्रमक पवित्रा घेतल्या नंतर तात्काळ वरले



ग्रामपंचायतने डावळलेल्या कातकरी वाडीला पाणी मिळण्यासाठी हालचाली सुरु केल्या. श्रमजीवी संघटनेमुळे तब्बल सहा महिन्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर अखेर वरले कातकरी वाडीतील आदिम कातकरी नागरिकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे कातकरी वाडीतील लहान मुलांमध्ये, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान वरले कातकरी वाडीला स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी श्रमजीवी संघटनेचे जिल्हा सचिव किशोर मढवी, तालुका अध्यक्ष भरत जाधव, तालुका सचिव सुरज दळवी, तालुका उपाध्यक्ष सुजाता पारधी, बाळू लहांगे, वाडा शहर अध्यक्ष योगिता गावित, तालुका महिला ठिणगी प्रमुख सुगंधा विघ्ने, तालुका महिला ठिणगी उपप्रमुख मिरा टोकरे, प्रतिभा वाघ यांच्यासह इतर कार्यकर्ते आणि सभासदांनी प्रयत्न केले.

# शहरात शिवाजीनगर भुयार मार्ग बाबतीत आज मनपाची तात्काळ विशेष बैठक



**दैनिक वादळ वार्ता**
**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर -शहरात शिवाजीनगर भुयार मार्ग बाबतीत आज विशेष बैठक बोलावण्यात आली. बांधकाम विभाग, जीवन प्राधिकरण आणि वीज मंडळ तिन्ही विभागातील अधिकारी उपस्थित होते. नेमक्या समस्या आणि उपाय याबाबत सविस्तर माहिती घेऊन चर्चा करण्यात आली. येथील गती रोधक, शेजारची डीपी, पाईप लाइन, वायर आदीबाबत सूचना दिल्या गेल्या. येत्या पंधरा दिवसात यावर कार्यवाही करून माहिती देण्यास सांगितले. महानगरपालिका पदाधिकारी, आयुक्त तसेच अन्य अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा! आमदार बाबुराव कदम साहेब यांच्या उपस्थितीत हदगाव रुग्णालयाच्या सुवर्ण यशाचा जल्लोष; भविष्यातील विकासकामांचा घेतला आढावा

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य सेवेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी दिला जाणारा अत्यंत मानाचा 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार' आणि 'महा आरोग्य सन्मान २०२६' मध्ये हदगाव उपजिल्हा रुग्णालयाने (५० बेड) प्रथम क्रमांक पटकावला आहे. या द्वैभाषिक यशाने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, संपूर्ण परिसरातून रुग्णालयावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

कर्मचाऱ्यांच्या परिश्रमाचे फळ

या उल्लेखनीय यशाबद्दल रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारिका, अधिसेविका, सहायक अधिसेविका, लिपिक, तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी, वाहन चालक, कक्षसेवक, सफाईगार आणि शिपाई अशा सर्वच स्तरांवरील कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या सांघिक प्रयत्नांमुळेच रुग्णांना दर्जेदार सेवा देणे शक्य झाले, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



कामाचा आढावा आणि भविष्यातील नियोजन

पुरस्काराच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात रुग्णालयाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने:

* सेवा गुणवत्ता: विविध विभागांतील रुग्णसेवेचा दर्जा तपासण्यात आला.
* अडचणींवर चर्चा: नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देताना येणाऱ्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्याबाबत चर्चा झाली.
* विकास मार्गदर्शन: सर्व विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून भविष्यातील आधुनिकीकरण आणि विकासाच्या दृष्टीने उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

हा पुरस्कार म्हणजे उपजिल्हा रुग्णालयाने गेल्या काही काळात केलेल्या प्रामाणिक कामाची पावती आहे. सेवा अधिक सुलभ आणि लोकाभिमुख करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

मान्यवरांची उपस्थिती

या प्रसंगी श्री आमदार बाबुराव कदम साहेब ! विवेक देशमुख (जिल्हाप्रमुख, नांदेड), वैद्यकीय अधिकारी डॉ. दरबतरवार, डॉ. स्वामी, श्री. भास्कर वानखेडे, श्री. राजेश तावडे (सदस्य, रुग्णकल्याण समिती), श्री. व्यवहारे (काका), श्री. विशाल घोडेकर, श्री. आकाश डांगे, श्री. सलमान पठाण, नगरसेवक श्री. नामदेव वाकोडे, नगरसेवक श्री. पांडुरंग जाधव, युवा नेते शरद पाटील हरडफकर. तुकाराम तवर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

हदगाव उपजिल्हा रुग्णालयाचा गौरव; 'आरोग्य रत्न' आणि 'महा आरोग्य सन्मान' पुरस्काराने सन्मानित

# वडफळी येथे नर्मदेश्वर महादेवाचा यात्रोत्सव १५ पासून होणार प्रारंभ

## मंदिराच्या विकासासाठी ट्रस्टची स्थापना : सातपुड्यातील प्रसिद्ध यात्रा

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रविंद्र वळवी**

सातपुड्याच्या दऱ्या खोऱ्यात असणारे अक्कलकुवा तालुक्यातील वडफळी हे गांव महाराष्ट्र गुजरातच्या सीमेवर आणि देव नदीच्या काठावर वसलेले आहे. या गावातील नर्मदेश्वर महादेवाची यात्रा ही सातपुड्यातील प्रसिद्ध यात्रा मानली जाते आणि या यात्रेची सुरुवात ही १५ व १६ एप्रिल पासून होत आहे.पूर्वी गुजरात महाराष्ट्र सीमेवर नर्मदेच्या काठावर असलेल्या सुलपाणेश्वर (मणीबेली) येथे महादेवाची यात्रा भरत होती. या यात्रेसाठी व्यापारी वर्ग व आदिवासी बांधव देव दर्शनासाठी महाराष्ट्रातून हजारोच्या संख्येने पायपीट करत मणिबेली येथे जात असत तेव्हापासूनच वडफळी गावाच्या यात्रेला देखील सुरुवात झाली असे सांगितले जाते. या यात्रेला जाणाऱ्या व्यापाऱ्यांपैकी एका व्यापाऱ्याचा किरकोळ आजाराने मृत्यू झाला होता व त्याच कुटुंबातील व्यापारी वडफळीला येऊन पुजा करुन तेथे झेंडा रोवल्यावर यात्रेला सुरवात होत असते आजतागायत ही परंपरा कायम राहिली आहे.

पूर्वीच्या काळात अतिदुर्गम भागात रस्ते दळणवळणाची साधने नव्हती त्यामुळे शहादा, नंदुरबार, धडगाव, अक्कलकुवा, सागबारा, तळोदा, मोलगी, डेडीयापाडा,भरुच,नेत्रंग अशा वेगवेगळ्या शहरातून व्यापारी गाढवावर ओझे लादून वडफळी यात्रेत येत असत ते आदल्या दिवशी वडफळी येथे मुक्काम करायचे आणि दुसऱ्या दिवशी सुलपाणेश्वर येथे जात असे.काही काळानंतर व्यापारी मुक्कामाला थांबत



असतांना व्यापारी आपला विक्रीसाठी आणलेला माल उघडे करुन वडफळी येथे विक्री करु लागले व लोकं ही मुक्कामाच्या ठिकाणी येऊन बाजार करु लागले असे करता करता वडफळी गावात दोन दिवसाची यात्रा व मनोरंजनासाठी सोंगाड्या पार्टी बोलावली जाऊ लागली आणि मणिबेली हे देवस्थान आता नर्मदेच्या बुडीत क्षेत्रात गेल्याने तेथील मंदिरेही पाण्याखाली गेली त्यामुळे यात्रा वडफळी गावात वसली गेली.वडफळी गावांतील लोकांनी पुढाकार घेऊन महादेवाचे मंदिर वडफळी गावांतच उभे करण्याचे ठरवले असून त्यासाठी मणिबेली येथील महादेवाचे पिंड महादेव भक्त कै.कमजी छगन तडवी यांनी आणुन त्याची प्राणप्रतिष्ठा केली आहे. सध्या मंदिर हे साधे कुडाचे घरात असल्याने मंदिराच्या विकासासाठी ग्रामस्थांनी मंदिर ट्रस्टची स्थापना केली आहे. पक्के मंदिर उभारणीचे काम सुरु असुन मंदिरात पुजारी म्हणून बचूभाई तडवी हे काम पाहत आहेत.या यात्रेला हजारोंच्या संख्येने भाविक येत असतात त्यामुळे या भविकांच्या सोईसाठी ग्रामस्थांनी सामाजिक सभागृहाची मागणी केली आहे. त्यामुळे प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून लक्ष देणे गरजेचे आहे.

# नगरसेविका अर्चनाताई शिंदेने रुग्णालयात फळे वाटून साजरा केला वाढदिवस!



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । दत्ता खंदारे**

धारावीतील वार्ड क्रमांक १८६च्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नगरसेविका सौ.अर्चना अविरत शिंदे यांनी नगरसेवकपदी निवडून आल्यावर मोठा गाजा वाजा न करता साधेपणाने वाढदिवस साजरा केला.

नगरसेविका अर्चना शिंदे यांनी अत्यंत साधेपणाने आणि सेवाभावी उपक्रमातून जबाबदारीची जाणीव ठेवून लोकमान्य टिळक महानगरपालिका सायन रुग्णालय,आयुर्वेदिक रुग्णालय सायन व टाटा कॅन्सर रुग्णालय येथे जाऊन रुग्णांना फळाचे वाटप करुन त्यांचे आशीर्वाद घेतले.यावेळी पंचशील गणेश मंदिर मंडळाचे पदाधिकारी तसेच शिवसेना शाखा क्र. १८६ चे शाखाप्रमुख किरण काळे, शिवसेना धारावी उप विभाग प्रमुख महादेव शिंदे, शिवसेनेचे पदाधिकारी आणि युवा सेनेचे युवा सैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# केकतसारणी येथील बहुचर्चित महादेव मंदिराचा निकाल ग्रामपंचायतच्या बाजुने,केज न्यायालयाचा महत्वपूर्ण निकाल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील केकतसारणी येथील बहुचर्चित महादेव मंदिराचा निकाल ग्रामपंचायतच्या बाजुने लागला आहे.केज न्यायालयाच्या या महत्वपूर्ण निर्णयाचे सर्वत्र स्वागत केले आहे. या बाबत सविस्तर माहिती अशी की,केज दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा क्रमांक १५८/२०२५नानाभाऊ विरुद्ध ग्रामपंचायत केकतसारणी दावा दाखल केला होता. सदरील प्रकरणात नानाभाऊ सोनाजी भोईटे यांनी ग्रामपंचायत केकतसारणी यांच्या विरुद्ध गावठाणच्या जागेवर महादेव मंदिर बांधू नये म्हणून दावा दिला होता व मनाई हुकूमचा अर्ज



दिला होता व केकतसारणी ग्राम पंचायतला प्रतिवादी केले होते.सदरील प्रकरणात प्रतिवादी कडुन दावा दाखल करून मनाई हुकुम अर्ज दाखल केला होता.दिवाणी व फौजदारी न्यायाधीश कुलकर्णी मॅडम यांच्या न्यायालयासमोर प्रकरण चालले व प्रकरणातील दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकून सदरील प्रकरणात वादी यांचा मनाई हुकूमाचा अर्ज खारीज करण्यात आला प्रति दाव्यातील प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात आला.त्यामुळे महादेव मंदिर बांधकामा साठीचा मार्ग मोकळा झाला आहे.सदरील प्रकरणात जेष्ठ विधीज्ञ एम.एस लाड,ए.एल. लाड,एस.एस.भांगे, जे.जी.बारगजे यांनी कामकाज पाहिले. निकाल आल्यानंतर ग्राम पंचायत व ग्रामस्थांच्या वतीने विधीज्ञ मंडळीचा शाल,श्रीफळ,पुष्पहार व बुके देऊन सत्कार करण्यात आला.या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

# केजमध्ये भा.ज.पा महीला जिल्हा उपाध्यक्षा सौ.उषाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन साजरा केला भाजपा स्थापना दिन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



माजी पंतप्रधान भारतरत्न स्व.अटल बिहारी वाजपेयी यांनी स्थापन केलेल्या भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन भाजपाच्या महीला आघाडीच्या बीड जिल्हा उपाध्यक्षा सौ.उषाताई रमाकांत मुंडे यांनी दि.६ एप्रील सोमवार रोजी केज येथील लक्ष्मीनगर मधील आपल्या काही निवडक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमीत्त घरी झेंडा लावून स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या नावाने व भाजपा पक्षाच्या घोषणा बाजी व फटाक्यांची आतिषबाजी करत आनंद उत्सव साजरा केला.स्व.अटल बिहारी वाजपेयी यांनी ४१ वर्षापूर्वी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली होती.या भाजपा पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा हे असुन त्यांच्या नेतृत्वाखाली चालत असलेल्या भाजपा पक्षाची सत्ता ही केंद्रात आणि महाराष्ट्र राज्यासह अनेक राज्यात सत्ता आल्याने भाजपा अध्यक्षांच्या व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशावरून सर्वत्र भाजपा स्थापना दिवस साजरा करण्याचा आदेश येताच महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री तथा जालन्याच्या पालकमंत्री मा.पंकजाताई मुंडे यांच्या विश्वासु बीडच्या भारतीय जनता पार्टीच्या महीला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षा सौ. उषाताई रमाकांत मुंडे यांनी केज येथील लक्ष्मीनगर येथे काही आपल्या निवडक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन भाजपा पक्षाचा स्थापना दिन साजरा करुन घरी झेडा लावून स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या नावाने व भाजपा पक्षाच्या घोषणा बाजी व फटाक्यांची आतिषबाजी करत आनंद उत्सव साजरा केला.यावेळी भाजपाचे जेष्ठ नेते रमाकांत (बापू) मुंडे, उद्योजक तथा देवगांव सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन मधुर भैय्या मुंडे,भागवत चिंचकर,अशोक सिरसट, शंकरनाईकनवरे,बालाजी बिक्कड यांच्यासह अनेक भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# माजलगांवात वाळू माफियांविरोधात लहुजी विद्रोही सेनेचा एल्गार; भव्य धरणे आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगांव । प्रतिनिधी**



माजलगांव येथे तहसील कार्यालयासमोर लहुजी विद्रोही सेना, महाराष्ट्र यांच्या वतीने बेकायदेशीर वाळू उपसा विरोधात दि. ७ रोजी भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत शासनाचे लक्ष वेधले.

या आंदोलनाचे नेतृत्व मातंग हृदयसम्राट लहुश्री भास्कर शिंदे (नानासाहेब) यांनी केले. यावेळी आंदोलकांनी शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून सुरू असलेल्या वाळू घाटांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. वाढत्या वाळू माफियांच्या कारवायांमुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असून प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान तहसील कार्यालय परिसरात घोषणाबाजी करत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन विविध मागण्या मांडण्यात आल्या.

*मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे :*

* शासनाच्या निर्णयांचे उल्लंघन करून सुरू असलेले ८ वाळू घाट तात्काळ बंद करण्यासाठी मा. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठवावा.
* वाळू माफियांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत.
* बेकायदेशीर वाळू उपशासाठी वापरली जाणारी JCB व पोकलॅन यंत्रे जप्त करण्यात यावीत.
* माजलगाव तालुक्यातील बेकायदेशीर वाळू उपसा पूर्णपणे बंद करावा.

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास येत्या काळात आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.या आंदोलनात शिवाजी कांबळे, राजेभाऊ खंडागळे, बप्पा कसबे, अनिल ढगे, विशाल गवळी, मंगेश शिंदे, कैलास गायकवाड, विलास लोखंडे, बाळू लोखंडे, रामभाऊ आलात, वैभव बडवणे, रोशन कसबे, सुनील थोरात, प्रदीप देशमाने, अमीर शेख, शुभम कसबे, नागनाथ आलात यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळीत आज अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संघटन सृजन अभियानाचे आयोजन ;काँग्रेस नेत्या नीतू वर्मा करणार पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन

## परळी वैजनाथ तालुक्यातील काँग्रेस सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे–काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या परळी वैजनाथ येथे काँग्रेस पक्षाने संघटनात्मक बळकटीसाठी सुरू केलेले 'संगठन सृजन अभियान' ८ एप्रिल रोजी होणार आहे. तसेच परळी वैजनाथ तालुक्यातील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची आढावा बैठक व पदाधिकारी निवड संदर्भात बैठक होणार आहे. तरी परळी वैजनाथ तालुक्यातील काँग्रेस सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष ड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने काँग्रेस पक्षाची पक्ष बांधणी, संघटना मजबुतीकरण हा उद्देश लक्षात घेता या माध्यमातून तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व इतर निवडीचे मुख्य काम या अभियानाच्या माध्यमातून केले जाणार आहे.

काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस उपाध्यक्ष तथा लोकसभेचे विरोधी पक्ष नेते खा. राहुल गांधी, मा. मल्लिकार्जून खर्गे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि राज्याचे काँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई अशोकराव पाटील , मा. अशोकराव पाटील , यांच्या मार्गदर्शनाखाली व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या संघटन सुजन अभियानच्या बीड जिल्हा प्रमुख मा.श्रीमती नितू वर्मा जी निरीक्षक अ.भा. काँग्रेस कमिटी नवी दिल्ली यांच्या सह मा.एम.एम.शेख (माजी आमदार) मा. सुरेंद्र गोडजकर (संघटन निरीक्षक) मा. श्रीमती विद्याताई पाटील (प्रदेश समन्वयक) तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कमिटी सरचिटणीस व मा. नगराध्यक्ष तथा काँग्रेस पक्षाच्या पिंपरी चिंचवड विधानसभा प्रभारी मा. आदित्य दादा पाटील, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित केली आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार संघटन सृजन अभियान अंर्तगत मा. तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विविध सेल अध्यक्ष, महिला काँग्रेस इ.च्या निवडीं संर्दभात या बैठकीत निर्णय घेण्यात येणार आहेत. परळीतील दि. ०८. ०४. २०२६ रोजी चेंबरी रेस्ट हाऊस, बीड रोड येथे होणाऱ्या अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने 'संघटन सृजन अभियान' हाती घेतले असून, महाराष्ट्रात हे अभियान पक्षाला तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. तसेच परळी वैजनाथ तालुक्यातील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची आढावा बैठक व पदाधिकारी निवड संदर्भात बैठक होणार आहे. तरी परळी वैजनाथ तालुक्यातील काँग्रेस सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077